
एम.आय.डी.सी.
पोलीस स्टेशन जळगाव
फोन नं. 0257 - 2210500 / 2210163
SMART POLICING
WARNING
CCTV

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

## -:प्रेस नोट :-

दिनांक :- २९/०६/२०२६

# "जळगाव एम.आय.डी.सी. पोलिसांची धडक कारवाई : गावठी कट्ट्यासह एक आरोपी जेरबंद "

===ooo===

दिनांक २८/०६/२०२६ रोजी पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत धनके यांना त्यांच्या गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, **" जळगाव विमानतळा समोरील कुरुंबा परिसरातून धनवड गावाकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर एक इसम गावठी कट्टा जवळ बाळगून फिरत आहे "** सदर माहिती पडताळणी करुन, श्री. बबन आव्हाड पोलीस निरीक्षक, एमआयडीसी पोलीस स्टेशन यांनी तात्काळ आपले पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक चंद्रकांत धनके, पोहेका/१८६२ रमेश बाबूलाल चौधरी, पोहेका/७० रामकृष्ण पाटील, पोको/३४२ किरण पाटील, पोको/२०३० गणेश ठाकरे, पोको/२००५ सुभाष साळवे, पोको/२४९६ रमाकांत साळुंखे, पोको/६७७ राहुल येथे, पोको/२९१ नितीन ठाकुर व पोको/१३९५ शशिकांत मराठे यांचे विशेष पथक तयार करून संशयितास ताब्यात घेण्याच्या मार्गदर्शनपर सुचना दिल्या.

त्यानुषंगाने तयार करण्यात आलेल्या पथकाने तात्काळ घटनास्थळी जाऊन सापळा रचला असता संशयित इसम पायी फिरताना दिसून आला. त्यास थांबण्याचा इशारा केला असता तो पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. मात्र पोलीस पथकाने त्याचा पाठलाग करून **आरोपीत नामे गणेश श्रावण सोनवणे (वय २४ वर्षे, व्यवसाय-मजुरी, रा. कुरुंबा, ता. जि. जळगाव** यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची व विसंगत उत्तरे दिली. त्याच्याकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्याने त्याची कायदेशीर अंगझडती घेण्यात आली. अंगझडतीदरम्यान त्याच्या जिन्स पँटच्या मागील बाजूस, कमरेला खोचलेला **गावठी कट्टा (मॅगझीनसह) मिळून आला.**

**जप्त मुद्देमाल :-**

**१) २०,०००/- रुपये किंमतीचा एक लोखंडी काळ्या रंगाचा गावठी कट्टा मॅगझीनसह**

**सदर गावठी कट्टा पंचांसमक्ष जप्त करण्यात आला असून आरोपीविरुद्ध एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, जळगाव येथे गुन्हा रजिस्टर क्र. ५७९/२०२६ अन्वये भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१), ३७(३) व १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

**सदरची कारवाई मा. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा. श्री संदीप गावित, अपर पोलीस अधीक्षक, जळगाव, मा. श्री नितीन गणपुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री बबन आव्हाड, पोलीस निरीक्षक, एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, यांचे नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक/चंद्रकांत धनके, पोहेका/१८६२ रमेश बाबूलाल चौधरी, पोहेका/७० रामकृष्ण पाटील, पोको/३४२ किरण पाटील, पोको/२०३० गणेश ठाकरे, पोको/२००५ सुभाष साळवे, पोको/२४९६ रमाकांत साळुंखे, पोको/६७७ राहुल येथे, पोको/२९१ नितीन ठाकुर व पोको/१३९५ शशिकांत मराठे या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

**************************************************************************************************